नियोजनबद्ध विकास

# पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,पुणे

**Pune Metropolitan Region Development Authority, Pune**

पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण,नवीन प्रशासकीय इमारत, आकुर्डी,पुणे-४४

Ph. No.020-27659855, Email: dyceoadm@gmail.com

जमीन व मालमत्ता विभाग (PMAY)


जा.क्र. प्राधिकरण/जमिन व मालमत्ता विभाग/ 3057 दिनांक :- 22/8/2025

## : जाहिर निवेदन :-

सर्व संबंधितांना कळविण्यात येते की,मौजे चिंचवड, ता. हवेली, जि.पुणे येथील खालील सर्व्हे नंबर प्रकरणी ७/१२ उताऱ्यावरील फेरफार व संपादन दाखल्यामध्ये नमूद केलेल्या सर्व्हे नंबरसाठी जमीन तत्कालीन पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या संपादनाच्या मोबदल्यात मुळ जमीन मालक मयत मारुती केसू वाल्हेकर यांचे वारस श्री.गंगाराम मारुती वाल्हेकर व इतर ९ व मयत धोंडीबा केसू वाल्हेकर यांचे वारस श्री. श्रीधर धोंडीबा वाल्हेकर व इतर ३ असे एकूण १४ वारसांनी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे कार्यालयाकडे ६.२५ टक्के परतावा जमीनीची मागणी केलेली आहे.

| अ. क्र. | मुळ जमीन मालकाचे नांव | सर्व्हे नं. | क्षेत्र (हे.आर.) | तपशील |
|---|---|---|---|---|
| १. | अ) ६ वे मे.सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर पिंपरी यांचेकडील वारस प्रमाणपत्र किरकोळ अर्ज क्र. ३५६/२०२४ आदेश पारित दिनांक १०/०२/२०२५ नुसार न्यायालयाने मयत मारुती केसू वाल्हेकर यांचे संपादित झालेल्या परताव्याबाबत खालीलप्रमाणे वारस घोषित केल आहेत -<br>१) श्री. गंगाराम मारुती वाल्हेकर<br>२) श्री. पांडुरंग मारुती वाल्हेकर<br>३) श्रीमती कौशल्या अशोक ढोरे | १४४/२,<br>१४५/२,<br>१४६/२,<br>१४७/२ | मौजे चिंचवड, ता - हवेली, जि. पुणे येथील सर्व्हे नं.१४४/२, क्षेत्र ०१ हे.२२ आर,<br><br>सर्व्हे नं.१४५/२, क्षेत्र ० हे.७५ आर,<br><br>सर्व्हे नं.१४६/२, क्षेत्र १ हे.०१ आर,<br><br>सर्व्हे नं.१४७/२, क्षेत्र ० हे.७४ आर, | १) फेरफार क्र. २०१७ नुसार दिनांक ०२ फेब्रुवारी १९६१ रोजी केसू सखाराम वाल्हेकर मयत असल्याने धोडींबा व मयत केसू वाल्हेकर यांच्या मुलींची नावे संपादित जमिनीचे कब्जेदार सदरी घेण्यात आले आहे. तदनंतर मयत केसू सखाराम वाल्हेकर यांचे मुलींनी हक्कसोड दिले असल्याने त्यांचे नाव फेर फार क्र. ३३९५ अन्वये कमी करणेत आले.<br><br>२) फेरफार क्र. ४४८२ नुसार पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण यांचे नाव महसुली अभिलेख्यावर कब्जेदार सदरी दाखल करण्यात आले आहे..<br>३) सर्व्हे नंबर १४४/२,१४५/२,१४६/२,१४७/२ साठी निवाडा क्र. LAQ/IX/UDPH/SR/१ दिनांक २४/०७/१९७५ अन्वये जाहिर करुन जमिन संपादित केली आहे. |

<table>
<tr>
<td></td>
<td>४) श्रीमती जया मारुती चौधरी,<br>५) श्री. यशवंत बजरंग तापकिर<br>६) श्री. सनी किरण गायकवाड<br>७) श्रीमती नेहा रविंद्र ढमक<br>८) श्रीमती निर्मला भागवत वाल्हेकर<br>९) श्री. गणेश भागवत वाल्हेकर<br>१०) श्रीमती निता सचिन सातव<br>ब) ८ वे मे. सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, पिंपरी पुणे यांचेकडील किरकोळ अर्ज क्र.३२०/२०२४ आदेश पारित दिनांक ०४/०१/२०२५ नुसार मुळ जमिन मालक मयत मारुती केसू वाल्हेकर यांचे पुढीलप्रमाणे वारस घोषित करणेत आले आहेत<br>१) श्री. श्रीधर धोंडीबा वाल्हेकर,<br>२) श्रीमती वेवी नारायण नखाते, (लग्नापुर्वीचे नाव - वेवी धोंडीवा ऊर्फ धोंडीराम वाल्हेकर)<br>३)श्री. शांताराम धोंडीवा वाल्हेकर,</td>
<td></td>
<td>एकुण संपादित क्षेत्र ३ हे. ७२ आर</td>
<td>४) उपजिल्हाधिकारी, भूसंपादन क्र. ३ यांचेकडील पत्र जा.क्र. आस्था/कावि/३४०/२०२४ दिनांक ०६/०९/२०२४ रोजीच्या पत्रात नुकसान भरपाई रक्कम व अदा दिनांक खालीलप्रमाणे नमूद आहे.
<table>
<tr><th>कब्जेदाराचे नाव</th><th>ग.नं./ सं/नं.</th><th>संपादित क्षेत्र हे. आर</th><th>नुकसान भरपाईची रक्कम व अदा दि.</th></tr>
<tr><td>मारुती केसू वाल्हेकर<br>धोंडीबा केसू वाल्हेकर</td><td>१४४/२<br>१४५/२<br>१४६/२<br>१४७/२</td><td>१-२२<br>०-७५<br>१-०१<br>०-७४</td><td>२५,६६८.००/-<br>दिनांक १४/०८/१९७५</td></tr>
</table>
मुळ जमीन मालक मयत मारुती केसू वाल्हेकर यांचे वारस श्री.गंगाराम मारुती वाल्हेकर व इतर ९ व धोंडीबा केसू वाल्हेकर यांचे वारस श्री. श्रीधर धोंडीबा वाल्हेकर व इतर ३ असे एकूण १४ वारसांना उपरोक्त संपादित जमिनीच्या हिस्स्यानुसार ६.२५% परतावा मागणी आहे.</td>
</tr>
</table>

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | ४) श्रीमती रंजना रविंद्र जुनावणे, (लग्नापुर्वीचे नाव - रंजना धोंडीबा ऊर्फ धोंडीराम वाल्हेकर) | | | |

उपरोक्त प्रकरणातील अन्य हित संबंधित व्यक्ती मौजे चिंचवड, ता. हवेली, जि. पुणे येथील उपरोक्त सर्व्हे नंबरच्या मोबदल्यासाठी/परताव्यासाठी पात्र असल्यास त्यांनी योग्य तो कायदेशीर पुरावा या कार्यालयाकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांचे आत पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, आकुर्डी पुणे ४११ ०३५ येथील कार्यालयाकडे सादर करावा. तसेच हरकतीसोबत कायदेशीर पुरावे सादर करणे आवश्यक आहे. तसेच विहीत मुदतीनंतर हरकत दाखल झाल्यास सदर हरकतींचा विचार केला जाणार नाही. तसेच उपरोक्त जमीनीसाठी अर्जदार यांचे व्यतिरिक्त अन्य कोणी हितसंबंधीत नाही असे गृहित धरुन पुढील कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.

दिनांक - २२/०८/२०२५

ठिकाण- पुणे

(हिम्मत खराडे)

**(प्र.) सह आयुक्त,**

**जमीन व मालमत्ता विभाग, पुमप्रविप्रा**

**पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण पुणे**

जाहिर निवेदन 6.25%.docx